# ३. गायन

बालगीत

## किती हे सुंदर फुलपाखरू

चला चला रे धरू
किती हे सुंदर फुलपाखरू ||
पिवळे, काळे, निळे, जांभळे
रंग पहा हे वेगवेगळे
पंखांवरती शोभून दिसले
फुलाफुलांवर बसुनी थोडे
पुन्हा लागले फिरू..... || १ ||

पकडू का गं आई त्याला ?
घेऊन जाईन खेळायला
त्रास मुळी ना देईन याला
मित्रमैत्रिणी सगळे आम्ही
लाडच त्याचे करू.. || २ ||

आई म्हणते धरू नका रे
इटुकले हे गरीब बिचारे
दुखतील त्याचे पंख चिमुकले
घरी कसे जाईल ते सांगा
मोकळेच द्या फिरू
किती हे सुंदर फुलपाखरू.... || ३ ||







# समूहगीत / निसर्गगीत

## पतंग

एक पतंग जांभळा, जांभूळ खाल्ल्यापरी
एक पतंग निळाभोर, शोभा त्याची खरी ||
एक पतंग आकाशी, आकाशीची छाया
एक पतंग हिरवागार, धरित्रीची माया ||
एक पतंग पिवळा धमक, शेवंतीचे तबक
एक पतंग नारिंगी, नारिंगाहून सुबक ||
एक पतंग लालेलाल, उंच उंच गेला
पतंगाच्या रंगाचा गोफ सुंदर झाला ||
त्याचे रंग आपल्यापेक्षा सुंदर, येता दिसून
रागावलेले इंद्रधनुष्य कोठे बसले रुसून ? ||

**(वसंत बापट, किशोर दिवाळी ७२)**

## अंगतपंगत

अंगत पंगत जमाडी गंमत
लाडू वाढले पंगतीला
जिलेबी होती सोबतीला ||
दोघांचे झाले संगनमत
पळून जाऊया लपत छपत ||
लाडूचा चेंडू जिलबीचं चाक
धूम पळाले गळतोय पाक ||
पकडा पकडा धरा धरा !
लोक उठले भराभरा ||

**कमला पवार, किशोर जुलै ७३**

# लोकगीत

## लोकगीत

लोकांच्या मनातला आनंद, दुःख, निराशा या गोष्टी जेव्हा गाण्यातून सांगितल्या जातात तेव्हा त्या गाण्याला लोकगीत असे म्हणतात. लोकगीत खूप तऱ्हेतऱ्हेची आहेत. त्यापैकी शेतीसाठी पाऊस पडावा म्हणून म्हटले जाणारे हे लोकगीत वाचा.

धोंडी बाई धोंडी | धोंडी गेली हाटा
पाऊस आला मोठा
धोंडीच्या भाकरी भिजल्या
आमच्या कण्या शिजल्या
भिजू द्या ग भिजू द्या, चारा पाणी पिकू द्या
खंडीभर दाणा पिकू द्या |

**(मराठी संस्कृती मराठी अस्मिता)**

**माझी कृती :**

- एखादे लोकगीत मिळवून पाठ करा.

______________________________
______________________________
______________________________
______________________________
______________________________
______________________________

# स्वरालंकार

**सा रे ग म प ध नी** या सात स्वरांच्या समूहाला ‘सप्तक’ असे म्हणतात. एका सप्तकात ७ शुद्ध स्वर, ४ कोमल स्वर व १ तीव्र स्वर असे एकूण १२ स्वर समाविष्ट असतात.

१) **आरोह :** साग रेम गप मध पनी धसां


**अवरोह :** सांध नीप धम पग मरे गसा


२) **आरोह :** सागरेसा रेमगरे गपमग मधपम पनीधप धसांनीध नीरेंसांनी सांगरेंसां

**अवरोह :** सांगरेंसां नीरेंसांनी धसांनीध पनीधप मधपम गपमग रेमगरे सागरेसा

३) **आरोह :** सारेगसारेगम रेगमरेगमप गमपगमपध मपधमपधनी पधनीपधनीसां

**अवरोह :** सांनीधसांनीधप नीधपनीधपम धपमधपमग पमगपमगरे मगरेमगरेसा






**माझी कृती :** स्वरालंकार लिहा.

________________________________________

________________________________________

________________________________________

- स्वरालंकाराचा सराव घ्यावा. आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे. आरोह अवरोह समजावून द्यावेत.